


दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

**वर्ष : ०४**, अंक : २०८
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, सोमवार, दि.१० मार्च २०२५


## थोडक्यात

### इन्स्टाग्रामवर मैत्री करुन अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**दि.०९, शिरुर :** सोशल मिडियावरील इंस्टाग्रामवर ओळख आणि मैत्री करुन अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याप्रकरणी १६ वर्षीय विधी संघर्षित बालकास ताब्यात घेण्यात आले आहे. याबाबत पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार ७ मार्च २०२५ रोजी दुपारी ३ वाजता व ६ मार्च रोजी दुपारी २ च्या सुमारास कारेगाव ता. शिरूर जि पुणे येथील मल्हार हिल्स येथे हा प्रकार घडला. अल्पवयीन मुलगा वय १६ वर्षे याने अल्पवयीन मुली सोबत इन्स्टाग्रामवर ओळख करून तीचेशी मैत्री केली व कारेगाव येथील त्याचे राहते घरी घेवुन जावुन मी तुझ्यावर खुप प्रेम करतोय, तु मला खुप आवडतेस असे म्हणुन जबरदस्तीने दोन वेळा शारीरीक संबंध केले. तसेच सदर गोष्ट कोणाला सांगितली तर जीवे मारून टाकीन अशी धमकी दिली. याप्रकरणी पोलीसांनी बाल लैंगिक अ. सं.अधि.२०१२ चे कलम ४,८,१२.अ.जा.ज.अत्या. प्रति. सुधा.अधि.२०१५ चे कलम ३(१) (w)(i) (ii),3(2)(v) नुसार गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी विधीसंघर्षित बालक यास ताब्यात घेऊन कायदेशीर कारवाई करण्यात आली असून पोलीस उपअधीक्षक प्रशांत ढोले व पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे आधिक तपास करीत आहेत.

### उरणच्या शेकडो एकर शेतजमिनीवर खारफुटीचे आक्रमण

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०९, उरण :** समुद्र किनाऱ्यावर खारभूमीवर निर्माण करण्यात आलेल्या शेतजमिनीत भरतीचे पाणी शिरल्याने शेकडो एकर क्षेत्रावर खारफुटी उगवली आहे. कांदळवन संरक्षित असल्याने या जमिनीचा शेतकऱ्यांना वापर करता येत नाही. येथील शेतकऱ्यांवर आपल्या मालकीच्या जमिनी गमावण्याची वेळ आली आहे. शेतकऱ्यांनी खारफुटीचे शेतीवरील वाढते आक्रमण थांबवून शेतीचे संरक्षण करण्याची मागणी केली आहे.

समुद्र किनाऱ्यावर वसलेल्या परिसरात मोठ्या प्रमाणात भात शेती आहे. या शेतीचे समुद्राच्या भरतीच्या पाण्यापासून बचाव करण्यासाठी खाडी आणि समुद्र यांच्यात बांध बांधण्यात आले आहेत. या बांधांच्या सुरक्षेची जबाबदारी अनेक वर्षे शेतकऱ्यांकडे होती. मात्र मागील काही वर्षांपासून ही जबाबदारी खारलँड विभागाकडे आहे. त्यामुळे हे बांध सातत्याने फुटून खारे पाणी शेतीत येऊ लागले आहे. तर दुसरीकडे भरतीचे पाणी पुन्हा समुद्रात जाण्याची नैसर्गिक नाले होते. हे नाले विकासाच्या नावाने मातीचा भराव टाकून बुजविण्यात आले आहेत. परिणामी भरतीचे पाणी परत न जाता शेतीत शिल्लक उरते. त्याच बरोबरीने आलेले. खारफुटीचे बीज शेत जमिनीत रुतून खारफुटी उगवू लागली आहे. न्यायालय आणि वन विभागाच्या नियमामुळे शेती असूनही शेतकऱ्यांना आपल्या हक्कच्या जमिनी गमवाव्या लागत आहेत. यावर शासनाने उपाययोजना करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशी मागणी धुतुम ग्रामपंचायतीचे माजी सरपंच धनाजी ठाकूर यांनी केली आहे.

## भारताने चॅम्पियन्स ट्रॉफीवर कोरलं नाव! न्यूझीलंडवर मिळवला ऐतिहासिक विजय

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०९, दुबई :** भारतीय संघाने ऐतिहासिक कामगिरी करत चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ चे जेतेपद पटकावले आहे. भारताने न्यूझीलंडचा अंतिम सामन्यात ४ विकेट्सने पराभव केला. जडेजाने ४९व्या षटकातील अखेरच्या चेंडूवर विजयी चौकार लगावत संघाला विजय मिळवून दिला. भारताने रोहित शर्माच्या नेतृत्त्वाखाली संपूर्ण स्पर्धेत एकही सामना न गमावता ही स्पर्धा आपल्या नावे केली आहे. रोहित शर्माने ७६ धावा करत सामन्याचा सामनावीर ठरला.

भारताच्या विजयासह टीम इंडिया चॅम्पियन्स ट्रॉफीचे जेतेपद तिसऱ्यांदा पटकावणारा पहिला संघ ठरला. यासह भारताने गेल्या १० महिन्यात दुसरी आयसीसी स्पर्धा जिंकत ट्रॉफी आपल्या नावे केली. न्यूझीलंडने दिलेल्या २५२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताचा कर्णधार रोहित शर्माने वादळी खेळी करत संघाच्या विजयाच्या पाया रचला. रोहित शर्माने ८३ चेंडूत ७ चौकार आणि ३ षटकारांसह ७६ धावा केल्या, तर शुबमन गिलने ५० चेंडूत एका षटकारासह ३१ धावा केल्या. श्रेयस अय्यर आणि अक्षर पटेलच्या भागीदारीने भारताला सामन्यात कायम ठेवलं. श्रेयस अय्यर ६२ चेंडूत २ चौकार २ षटकारांसह ४८ धावा करत बाद झाला. तर अक्षर पटेलने ४० चेंडूत १ चौकार १ षटकारासह २९ धावा करत बाद झाला. तर राहुल आणि हार्दिकने भारताला विजयाच्या उंबरठ्यावर नेले. तर रवींद्र जडेजाने विजयी चौकारासह भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केला.










चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ च्या अंतिम सामन्यात ३४ धावांची नाबाद खेळी खेळून टीम इंडियाला विजयाच्या उंबरठ्यावर ठेवत राहुल नाबाद परतला. यावेळी त्याला हार्दिक पंड्याचीही साथ लाभली ज्याने १८ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. किवी संघाकडून मायकेल ब्रेसवेल आणि मिचेल सँटनर यांनी प्रत्येकी २ विकेट घेतले.

न्यूझीलंड संघाने नाणेफेक गमावत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पण पुन्हा एकदा भारताच्या फिरकी चौकडीने आपली कामगिरी चोख बजावली. भारताच्या फिरकी विभागाने चांगली कामगिरी करत धावांवर अंकुश ठेवला आणि न्यूझीलंडला २५१ धावांवर रोखलं. रचिन रवींद्र आणि विल यंगने किवी संघाला अर्धशतकी भागीदारी रचत चांगली सुरूवात केली. पण रोहित शर्माची रणनिती आणि भारताच्या फिरकी विभागाने टीम इंडियाला सामन्यात परत आणले. न्यूझीलंडकडून रचिन रवींद्रने ३७ धावा, डॅरिल मिचेलने ६३ धावा आणि ब्रेसवेलने ५३ धावांची खेळी केली. भारताकडून कुलदीप यादव आणि वरूण चक्रवर्तीने २ विकेट्स तर रवींद्र जडेजा-मोहम्मद शमीने १-१ विकेट घेतली. रोहित शर्माने कमालीचे नेतृत्त्व करत संघाला विजय मिळवून दिला.

**चॅम्पियन्स ट्रॉफीच्या विजयासह रोहित शर्माची धोनीशी बरोबरी**

दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर झालेल्या आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ मध्ये भारताने रोहित शर्माच्या नेतृत्त्वाखाली स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. या अंतिम सामन्यात भारताने न्यूझीलंडच्या २५२ धावांच्या आव्हानाचा यशस्वी पाठलाग करत चार विकेट्सने विजय मिळवला.

या विजयानंतर, रोहित शर्मा भारताकडून दोन आयसीसी ट्रॉफी जिंकणारा दुसरा कर्णधार ठरला आहे. यापूर्वी रोहितच्या नेतृत्त्वाखाली भारताने २०२४ मध्ये बार्बाडोसमध्ये झालेल्या आयसीसी टी२० विश्वचषक स्पर्धेत दक्षिण आफ्रिकेचा पराभव करत विजेतेपद मिळवले होते. रोहितच्या आधी, एमएस धोनीने तीन आणि सौरव गांगुली व कपिल देव यांनीही भारताला प्रत्येकी एक आयसीसी स्पर्धेते विजेतेपद मिळवून दिले होते. रोहितने या सामन्यात ८३ चेंडूत ७६ धावांची शानदार खेळी करत भारताच्या विजयाचा पाया रचला.

रोहितच्या या खेळीत सात चौकार आणि तीन षटकारांचा समावेश होता. त्याने दुसऱ्याच चेंडूवर काइल जेमिसनला त्याच्या ट्रेडमार्क पुल शॉटद्वारे षटकार मारत खाते उघडले होते. यादरम्यान त्याने ४१ चेंडूत त्याचे अर्धशतक पूर्ण केले. याचबरोबर रोहितची ७६ धावांची खेळी, त्याची आयसीसी स्पर्धेच्या अंतिम सामन्यातील पहिलेच अर्धशतक ठरले.

२७ व्या षटकात रोहित बाद झाल्यानंतर, २६.१ षटकात भारताची स्थिती ३ बाद १२२ अशी होती. पण, श्रेयस अय्यर (६२ चेंडूत ४८) आणि अक्षर पटेल (४० चेंडूत २९) यांनी चौथ्या विकेटसाठी ६१ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी केली. राहुल आणि अक्षर बाद झाल्यानंतर, केएल राहुल (३३ चेंडूत ३४*), हार्दिक पंड्या (१८ चेंडूत १८) आणि रवींद्र जडेजा (६ चेंडूत ९) यांनी ४९ षटकांत भारताला विजय मिळवून दिला.

रोहित जगातील पहिला कर्णधार आहे, ज्याने आपल्या संघाला वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप २०२३, एकदिवसीय विश्वचषक २०२३, टी२० विश्वचषक २०२४ आणि चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ या चारही प्रमुख आयसीसी स्पर्धांच्या अंतिम फेरीत नेले आहे. यामध्ये भारताला भारताला टी२० विश्वचषक २०२४ आणि चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ चे विजेतेपद मिळवण्यात यश आले.

## गुटखा माफियांना अभय देणाऱ्यांविरोधात संताप !

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.०९, भिवंडी (ठाणे) :** गणेशपुरी पोलिस ठाण्याच्या हद्दीत गुटख्याने भरलेला टेम्पो पकडून कायदेशीर कारवाई करणाऱ्या पोलिस उपनिरीक्षक उमेश रोठे यांच्यावर झालेल्या अन्यायकारक कारवाईविरोधात तरुणांनी आंदोलनाची तयारी केली आहे. गुटखा माफियांवर कारवाई केल्याच्या मोबदल्यातच प्रामाणिक अधिकाऱ्याला त्रास देण्याचा प्रकार घडल्याने नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

भिवंडी तालुक्यातील गणेशपुरी पोलिस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुटखा तस्करी सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर काही पत्रकारांनी गुटख्याने भरलेला टेम्पो अडवून पोलिसांना कळवले. घटनास्थळी दाखल झालेल्या पोलिस उपनिरीक्षक उमेश रोठे यांनी कायद्याच्या चौकटीत राहून तातडीने कारवाई करत टेम्पो जप्त केला आणि आरोपींना अटक केली. तब्बल २२ ते २५ लाख रुपयांचा गुटखा हस्तगत करत त्यांनी या रॅकेटच्या मुळाशी जाण्याचा प्रयत्न केला.

मात्र, ही कारवाई काही जणांना नकोशी वाटली. गुटखा तस्करांचे



राजकीय गॉडफादर आणि पोलिस खात्यातील काही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणात हस्तक्षेप करत रोठे यांच्यावर कारवाई थांबविण्यासाठी दबाव टाकला. कोणत्याही दबावाला न जुमानता रोठे यांनी आपले कर्तव्य प्रामाणिकपणे बजावले. मात्र, त्यांचा हा प्रामाणिकपणा चांगलाच महागात पडला.

**खोट्या आरोपांचा डाव; प्रामाणिक अधिकाऱ्याला त्रास**

रोठे यांनी केलेल्या कारवाईच्या तपासासाठी त्यांनी तयार केलेल्या रिमांड रिपोर्टमध्ये छेडछाड करून डुप्लिकेट अहवाल तयार करण्यात आला. त्यावर आधारित खोट्या आरोपांचा आधार घेत रोठे यांची मुख्यालयात बदली करण्यात आली. प्रामाणिक अधिकारी आणि कायद्याचे पालन करणाऱ्यांनाच लक्ष्य केल्याने स्थानिक नागरिक व तरुणांमध्ये संतापाची लाट पसरली आहे.

**तरुणांचे आंदोलन, सह्यांची मोहीम सुरू...**

या प्रकारामुळे तरुण आक्रमक झाले असून गणेशपुरी भागातील युवकांनी पोलिस उपनिरीक्षक उमेश रोठे यांच्यावर झालेल्या कारवाईच्या विरोधात मोठ्या प्रमाणावर सह्यांची मोहीम हाती घेतली आहे. जर ही कारवाई मागे घेतली गेली नाही, तर याविरोधात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा कृती समितीने दिला आहे.

**मुख्यमंत्र्यांनी हस्तक्षेप करावा : तरुणांची मागणी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली गृहखाते असताना गुटखा माफियांना पोलिस विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून अभय मिळत असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. लवकरच कृती समिती पत्रकार परिषद घेऊन गुटखा तस्करीच्या संपूर्ण तपशीलासह वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या भूमिकेचा पर्दाफाश करणार आहे. तरुणांनी आता या अन्यायाविरोधात रस्त्यावर उतरण्याचा निर्धार केला आहे. प्रामाणिक पोलिस अधिकाऱ्यांना असा त्रास होणार असेल, तर कायद्याचा धाक फक्त सामान्यांसाठीच आहे का, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

## जळोली गावात अवैध गांजा साठा करणाऱ्यावर करकंब पोलीसांची कारवाई...




**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०८, पंढरपूर :** ८ मार्च रोजी करकंब पोलीस ठाणेकडील सपोनि /सागर कुंजीर यांचे मार्गदर्शनखाली गोपनिय बातमीदार यांचे मार्फतिने पोलीस हवालदार आर आर जाधव व पोलीस हवालदार संदेश शिकतोडे यांनी गुप्त माहीती मिळवली होती की जळोली, ता. पंढरपूर या गावचे शिवारातील राजेंद्र रामराव नरसाळे, रा. जळोली ता. पंढरपूर हे गांजाचा अवैध बेकायदेशीर साठा केलेला आहे. त्याप्रमाणे करकंब पोलीस ठाणेकडील सपोनि सागर कुंजीर यांनी डॉ. अर्जुन भोसले उपविभागीय पोलीस अधिकारी पंढरपुर विभाग यांचे मार्गदर्शनखाली पोलीस निरीक्षक शंकर उमाकांत पटवारी नेमणुक श्री विठठ्ल मंदीर सुरक्षा शाखा पंढरपुर यांचेसोबत पोलीस पथकाने सकाळी छापा टाकुन कारवाई केली असता खालील नमुद मुददेमाल आरोपीकडे मिळून आलेला आहे. एकुण ५,६५,६४०/. रू किंमतीचा एकुण २८.२८२ किलो ग्रॅम वजनाचा गांजा वनस्पतीचे पाने, फुले, बोंडे असा मुद्देमालसह त्याचे आरोपी राजेंद्र रामराव नरसाळे याचे राहते घरी मिळुन आलेला आहे. सदरच्या प्रकरणी आरोपी राजेंद्र रामराव नरसाळे रा. जळोली यांचेवर गुंगीकारक औषधे द्रव्य आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ चे कलम ८ (क), २० (ब) ii (क) प्रमाणे सरकारतर्फे पोलीस हवालदार आर आर जाधव यांनी तक्रार देवुन गुन्हा दाखल केलेला आहे. आरोपी अटक करण्यात आलेली असुन सदरचा गुन्हयाचा तपास सुरु आहे. पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी व अपर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी पंढरपुर विभाग डॉ. अर्जुन भोसले यांचे मार्गदर्शनाखाली सदरची कारवाई करण्यात आलेली आहे.



# संपादकीय

## नदीजोड प्रकल्प...

मागील वर्षी लोकसभेत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे खासदार अमोल कोल्हे आणि भास्कर भगरे यांनी महाराष्ट्रासह देशातील नदीजोड प्रकल्पाविषयी लिखीत प्रश्न विचारला होता. यावर उत्तर देताना तत्कालीन जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांनी म्हटले होते की, दमनगंगा-पिंजळ नदीजोड प्रकल्पाचा डीपीआर तयार आहे. या प्रकल्पामुळे मुंबईचा पाणीपुरवठा सुरळीत होईल. पार-तापी-नर्मदा नदीजोड प्रकल्पाचाही डीपीआर तयार आहे. हे दोन्ही प्रकल्प महाराष्ट्र आणि गुजरात राज्यांतील आंतरराज्यीय आहेत. वैनगंगा-गोदावरी नदीजोड प्रकल्पाचा प्रस्ताव महाराष्ट्र सरकारने रद्द केल्याचे केंद्र सरकारने स्पष्ट केले होते . हे प्रकल्प केंद्राचे आहेत. मग महाराष्ट्रातील २० नदीजोड प्रकल्पांचा अहवाल तयार होता. त्याचे पुढे काय झाले ? केवळ दोनच तेही गुजरात राज्याशी संलग्न असलेले प्रकल्प पूर्ण होताहेत असे का?

मागील वर्षी लोकसभेत एका लेखी प्रश्नाच्या लेखी उत्तरात तत्कालीन जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांनी देशातील ३० आंतरराज्यीय नदीजोड प्रकल्पांच्या अंमलबजावणीची तयारी सुरु झाली असून यामध्ये महाराष्ट्रातील दोन प्रकल्पांचा समावेश आहे. २० राज्यांतर्गत नदीजोड प्रकल्पांचा समावेश आहे असे म्हटले होते. मात्र, यांपैकी काही प्रकल्प रद्द करण्यात आले. देशातील ३० नदीजोड प्रकल्पांपैकी २४ प्रकल्पांचा व्यवहार्यता अहवाल (एफआर) आणि ११ तपशीलवार प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्यात आला होता. यामध्ये महाराष्ट्रातील केवळ दोन आंतरराज्यीय नदीजोड प्रकल्पांचा आणि राज्यांतर्गत एका नदीजोड प्रकल्पाचा डीपीआर तयार होता. राज्यांतर्गत वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाचा डीपीआर तयार असल्याचे पाटील यांनी सांगितले होते. याव्यतिरीक्त कृष्णा-भीमा, दमनगंगा-गोदावरी, वैतरणा - गोदावरी, दमनगंगा-वैतरणा-गोदावरी, कोयना-मुंबई सिटी, गोदावरी-पूर्णा-मांजरा, कोयना -नीरा, मुळशी-भीमा, सावित्री-भीमा, कृष्णा-भीमा, जळगाव जिल्ह्यातील तापी नदीजोड, नर्मदा-तापी या प्रकल्पांचा पीएफआर तयार झाला असल्याचेही त्यांनी सांगितले होते. वैनगंगा-मांजरा, पातळगंगा-गोदावरी, सावित्री-कुंडलिका-भीमा, नार-पार-गिरना, तापी-गोदावरी हे नदीजोड प्रकल्प व्यवहार्य नसल्याचे सरकारने सांगितले. तर वैनगंगा-गोदावरी नदीजोड प्रकल्पाचा प्रस्ताव महाराष्ट्र सरकारने रद्द केल्याचे केंद्र सरकारने स्पष्ट केले होते.

**नदीजोड प्रकल्प फायदे तोटे**

पर्यावरणीय परिणाम:नदीजोड प्रकल्पामुळे जैवविविधतेला हानी पोहोचू शकते आणि पाण्याचे प्रवाह बदलू शकतात. ते पुन्हा जसे होते तसे करता येणार नाहीत याचाही विचार करायला हवा .विस्थापन समस्या: या प्रकल्पांना अनेकदा मोठ्या पायाभूत सुविधांच्या विकासाची आवश्यकता असते, ज्यामुळे समुदायांचे विस्थापन होऊ शकते, विशेषतः स्थानिक लोकसंख्येवर परिणाम होतो आणि सामाजिक आणि सांस्कृतिक व्यत्यय येऊ शकतात. खर्च आणि वित्तपुरवठा: नदीजोड प्रकल्पांसाठी आर्थिक खर्च प्रचंड आहे. आर्थिक व्यवहार्यता, संभाव्य खर्चाचा अतिरेक आणि इतर महत्त्वाच्या कल्याणकारी प्रकल्पांपेक्षा संसाधनांचे प्राधान्य याबद्दल चिंता असू शकते.

पर्यावरणीय संतुलन: भूजलाचे पुनर्भरण करणे आणि पर्यावरणीय संतुलन राखणे हे उद्दिष्ट असले तरी, नियोजनशून्यतेमुळे किंवा अनपेक्षित अंमलबजावणीमुळे जलसाठ्यांचे पाणी साचणे, क्षारीकरण किंवा ऱ्हास होऊ शकतो. आंतरराज्य संघर्ष: पाण्याचे वाटप हा वादग्रस्त मुद्दा आहे आणि राज्यांमध्ये नद्या जोडल्याने पाण्याचे हक्क, वाटप आणि वापर यावर वाद निर्माण होऊ शकतात, ज्यामुळे आंतरराज्यीय तणाव वाढण्याची शक्यता आहे.

तांत्रिक आव्हाने: देखभाल आणि देखरेख यासारख्या विशाल पायाभूत सुविधांचे व्यवस्थापन करण्याची व्यवस्था गुंतागुंतीची आणि प्रकल्पाच्या यशात अडथळा आणणारी ठरते याचा कोणी विचारही करत नाही. दीर्घकालीन व्यवहार्यता: बदलते हवामान नमुने आणि भविष्यातील पाण्याची उपलब्धता नदी जोड धोरणाच्या दीर्घकालीन व्यवहार्यतेवर परिणाम करू शकते, ज्यामुळे विकसित होत असलेल्या संकटांना प्रभावीपणे तोंड देता येणार नाही.

# प्लास्टिक पिशव्यांवर बंदी काळाची गरज !

काही दिवसांवर येणाऱ्या होळी आणि धुलिवंदनची धूम बच्चे कंपनीमध्ये आतापासूनच सुरु झाली आहे. होळीनिमित्त पाण्याने भरायचे फुगे आता दुर्मिळ झाल्याने गेल्या काही वर्षांपासून मुलांकडून जाडीने अत्यंत पातळ असणाऱ्या पिशव्यांचा फुग्यांप्रमाणे वापर केला जात आहे. दरवर्षी होळीच्या अनुषंगाने अशा पातळ पिशव्यांचा मोठ्या प्रमाणात वापर होत आहे. या पिशव्या फुटल्यावर त्यांचे तुकडे आहे तिथेच पडून राहतात. होळी आणि धुलीवंदनाच्या दिवशी रस्त्यांवर या पिशव्यांचा अक्षरशः खच पडलेला पाहायला मिळतो.

याच पिशव्या हवेमुळे जवळच्या गटारांत आणि नाल्यांत जातात आणि पुढे जे व्हायचे तेच होते. दरवर्षी एवढ्या मोठ्या प्रमाणात या पिशव्या येतात कुठून हा प्रश्न त्यावेळी सर्वांनाच पडतो. प्लास्टिक पिशव्यांविरुद्धच्या मोहिमेअंतर्गत सरकारी कर्मचारी विक्रेत्यांवर कारवाई करतात; मात्र या कमी जाडीच्या पिशव्या ज्या ठिकाणी तयार केल्या जातात त्या कारखान्यांवर किंवा त्यांच्या घाऊक व्यापाऱ्यांवर सरकारी अधिकाऱ्यांकडून कारवाई केली गेल्याचे आजतागायत ऐकिवात नाही. त्यामुळे प्लास्टिक पिशव्यांविरुद्ध सरकारची अधूनमधून उघडली जाणारी मोहीम ही पर्यावरणाच्या रक्षणासाठी असते की केवळ दंडवसुलीतून महसूल मिळवण्यासाठी असा प्रश्न सामान्य नागरिकांना पडल्यावाचून राहत नाही. २६ जुलै २००५ या दिवशी झालेल्या मुसळधार पावसाने साऱ्या मुंबईची तुंबई करून टाकली. मुंबई नगरीत आलेल्या या महापुराने शेकडों निष्पाप नागरिकांचा बळी घेतला. अनेकांच्या घरात पाणी शिरून कोट्यवधी रुपयांची वित्तीय हानी झाली. या महाप्रलयामागील कारणमीमांसा तपासताना अतिक्रमणामुळे मिठी नदीचे अरुंद होत चाललेले पात्र, नाल्यांच्या साफसफाईतील अनियमितता, स्थानिक लोकप्रतिनिधींचा हलगर्जीपणा यासांसारख्या अनेक गोष्टींवर चर्चा झाली. नाल्यांचा साफसफाईतील मोठा अडसर असतो तो प्लॅस्टिकच्या पिशव्यांचा. या प्लास्टिक पिशव्या गटारांच्या जाळ्या निकामी करतात. ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या पातळ पिशव्यांचा पुनर्वापर शक्य होत नाही. गटारांच्या जाळ्यांना असे पातळ प्लास्टिक चिकटल्यास पाण्याचा निचरा होत नाही. परिणामी पाणी बराच काळ बाहेर तुंबून राहते. जमिनीच्या तळाशी प्लास्टिक चिकटून राहिल्यास पाण्याचे नैसर्गिक स्रोत बंद होतात. कचऱ्याच्या ढिगाऱ्यातून अन्न शोधताना बऱ्याचदा प्लास्टिकच्या पिशव्या जनावरांच्या पोटात जातात ज्यामुळे त्यांचा जीवही जातो. पातळ प्लॅस्टिक पिशव्यांच्या संदर्भात नैसर्गिकरित्या कुजण्याची किंवा नष्ट होण्याची प्रक्रिया होत नसल्याने वर्षोनुवर्षे या पिशव्या तग धरून राहतात त्यामुळे अशा पातळ पिशव्यांवर बंदी घालणेच इष्ट असल्याचे लक्षात येऊन राज्यात ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या पिशव्यांवर कायद्याने बंदी घालण्यात आली. बंदी येताच सरकारच्या वतीने भरारी पथकांची नेमणूक करून प्लास्टिक पिशव्यांचे स्रोत असलेल्या किराणा मालाच्या, फळांच्या, भाज्यांच्या दुकानांवर धाडी टाकून ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या पिशव्या मोठ्या प्रमाणात जप्त करण्यात आल्या आणि त्या देणाऱ्या विक्रेत्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली ज्यामधून सरकार दरबारी लाखोंचा महसूल गोळा झाला. सरकारच्या अन्य मोहिमांप्रमाणे ही मोहीमही काही दिवसांनी थंड पडली, पातळ पिशव्या पुन्हा बाजारांत भाजी, फळे, मासे विक्रत्यांकडे दिसू लागल्या. कालांतराने कोणीतरी न्यायालयात याचिका दाखल करून, सरकार दरबारी निवेदने देऊन किंवा विरोधी पक्षाच्या निदर्शनास आणून देऊन राज्यात प्लास्टिक पिशव्यांवरील बंदीचे कसे तीनतेरा वाजले आहेत ही बाब निदर्शनास आणून देते आणि पुन्हा एकदा सरकार खडबडून जागे होते. पुन्हा नव्याने कारवाईला सुरुवात होते. २००५ सालापासून आजतागायत प्लास्टिक पिशव्यांसह समस्त प्लास्टिक वस्तूंवर ६-७ वेळा बंदीची मोहीम उघडण्यात आली असून सहाही वेळा ही मोहीम काही कालावधी चालल्यानंतर पुन्हा बंद पडली आहे. १ जुलै २०२२ पासून राज्यात प्लास्टिक(काही अपवाद वगळता) आणि थर्मोकोल यांवर कायमस्वरूपी बंदी आणण्यात आली आहे. काही वर्षांपूर्वी प्लास्टीकचा 'प' सुद्धा माहित नसणाऱ्या जगाला आज प्लास्टिकशिवाय जगणेही कठीण वाटू लागले आहे, त्यामुळे प्लास्टिकवरील बंदी यशस्वी होईल का याविषयी त्यावेळीच लोकांच्या मनात संभ्रम होता. सरकारच्या वतीने प्लॅस्टिकच्या सर्व वस्तूंना पर्यायही सुचवण्यात आले होते. त्या दरम्यान कापडी पिशव्यांना भलतेच महत्व प्राप्त झाले होते. पानाच्या टपऱ्यांपासून, वर्तमान पत्र विक्रेत्यांपासून ते हार्डवेअरच्या दुकानानांपर्यंत सर्वत्र कापडी पिशव्या विक्रीसाठी ठेवण्यात आल्याचे चित्र त्यावेळी पाहायला मिळत होते. ही मोहीम सुद्धा अपेक्षेप्रमाणे काही काळानंतर थंडावली. आजमितीला किराणा मालाचे दुकान, भाजीविक्रेता, फळ विक्रेता, मांस मटण विक्रेता, कापड विक्रेता, भांडी विक्रेता आदी सर्वांकडे प्लास्टिकच्या पातळ पिशव्या ग्राहकांना ना मागताही मिळू लागल्या आहेत. ट्रेन आणि एसटीमध्ये येणारे खाद्यपदार्थ आणि भाजी-फळ विक्रेतेही १०-१५ रुपयांच्या खरेदीवर या पातळ पिशव्या सहजपणे लोकांना बहाल करू लागले आहेत.

प्लास्टिक पिशव्यांविरुद्धची मोहीम यशस्वी करण्यासाठी विक्रेते आणि ग्राहक यांचे सहकार्य अत्यंत मोलाचे आहे. ग्राहक सोबत कापडी पिशव्या बाळगत नसल्याने लहान सहन वस्तूंच्या खरेदीनंतरही विक्रेत्यांकडून पिशवीची मागणी करतात. ग्राहक नाराज होऊन अन्य दुकानांत खरेदीसाठी जाऊ नये म्हणून विक्रेतेही ग्राहकांना देण्यास परवडतील अशा हलक्या दर्जाच्या आणि कमी जाडीच्या पिशव्या दुकानांत ठेवतात. ग्राहकांची मागणी आणि विक्रेत्यांचा नाईलाज यामुळे प्लास्टिक पिशव्यांना सध्यातरी बाजारात मरण नाही. गरज आणि पुरवठा या समांतर चालणाऱ्या बाबी असून गरज घटली किंवा नष्ट झाली कि पुरवठाही आपसूकच थांबतो या न्यायाने प्लॅस्टिकच्या पिशव्यांची जनमानसांत निर्माण झालेली गरज आज थांबवली गेली पाहिजे. पर्यावरणाचा समतोल ढासळण्यास कारणीभूत असणाऱ्या प्लास्टिक पिशव्यांचा वापर टाळण्याच्या दृष्टीने व्यापक जनप्रबोधन काळाची गरज असून त्यासाठी संबंधित सरकारी खात्यांसह सेवाभावी, सामाजिक आणि निसर्गप्रेमी संस्थांनी पुढाकार घेण्याची आज नितांत आवश्यकता आहे अन्यथा येणाऱ्या काळात २६ जुलैपेक्षा मोठा प्रलय पाहावा लागेल.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

# महामार्गावरील धानीवरी अपघात दोन दुचाकीस्वारांचा मृत्यू...

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.०९, डहाणू (पालघर) :** मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर डहाणू तालुक्यातील धानीवरी गावच्या हद्दीत झालेल्या भीषण अपघातात दोन दुचाकीस्वारांचा दुर्दैवी मृत्यू झाला. हा अपघात रविवार, ९ मार्च रोजी सकाळी ८.३० वाजताच्या सुमारास घडला.

अपघातात चेतन भोये (२८, रा. कासा) आणि राणी सुरेश बोरसा (२१, रा. शेणसरी) या दोघांचा जागीच मृत्यू झाला. प्राथमिक माहितीनुसार, चेतन आणि राणी हे दुचाकी (क्रमांक अपूर्ण) वरून गुजरातच्या दिशेने जात असताना एका अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. या धडकेमुळे दुचाकी नियंत्रण सुटून महामार्गावरील मध्यवर्ती सुरक्षा कठड्याला जोरदार धडकली.

धडक इतकी भीषण होती की, दोघेही महामार्गावर पडले आणि त्याच वेळी मागून भरधाव येणाऱ्या अज्ञात वाहनाने त्यांना चिरडले. त्यामुळे घटनास्थळीच दोघांचा दुर्दैवी मृत्यू झाला. दोन दिवसांपूर्वी याच ठिकाणी एका कार ने दुचाकी चालक याला धडक दिल्याने दुचाकी चालक गंभीर जखमी झाला होता, या ठिकाणी नदीवरील पुलाच्या दुरुस्ती चे काम गेल्या अनेक महिन्यापासुन संथ गतीने सुरु असून महामार्गावरील वाहतुक विरुद्ध दिशेने सुरु असल्याने दिशा दर्शक फलक नसल्याने वाहने वेगाने येत असल्याने अंदाज नसल्यामुळे अपघात होत असतात. त्यामुळे महामार्गावर रस्त्याचे काम सुरु असल्याचे ठिकाणी दिशा दर्शक फलक, तसेच मनुष्य बळ आदी ची व्यवस्था महामार्ग प्राधिकरण व ठेकेदार कंपनी यांनी करणे गरजेचे आहे. मात्र यांच्या ढिसाळ नियोजना अभावी अपघात होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. या घटने माहिती मिळताच कासा पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी दोघांचे मृतदेह ताब्यात घेत उपजिल्हा रुग्णालय, कासा येथे पाठवले. अपघात घडवून अज्ञात वाहनचालक फरार झाला असून त्याचा शोध घेण्यासाठी पोलिस तपास सुरू आहे. या दुर्दैवी घटनेमुळे डहाणू तालुक्यात हळहळ व्यक्त होत आहे. चेतन भोये आणि राणी बोरसा हे तरुण असल्यामुळे त्यांच्या अचानक निधनाने कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. महामार्गावर सातत्याने होणाऱ्या अपघातांमुळे नागरिकांमध्येही भीतीचे वातावरण आहे.

## सावित्री लेक..

शोभली जगाची माई
उरी ना स्वताचे बाळ
विधवाअनाथ मुलाचा
करे यशवंत सांभाळ

शिक्षण ज्योत लावता
तू झेलली शेण राळ
करत राहिली संघर्ष
सोसे टिका शिवराळ

सनातनी समाज ठेके
सद्वर्तना घेतला आळ
विधवांना न्याय द्याया
उपसला रूढीं गाळ

सत्य शोधक समाज
जोडली प्रवर्तन नाळ
विरोधी सनातन्यांचा
धुमसत राहिला जाळ

भिडेवाड्यात प्रशाला
नारी जीवना सकाळ
मुश्किले थांबवू पाही
भ्रृणहत्या ती विक्राळ

इतिहास वाचता कळे
ममता स्नेहलं दुधाळ
शतके लोटली तरीही
जाणे अस्तित्व मधाळ

नारी उज्वल भविष्य
नमन करे तुज काळ
सावित्रीची लेक नात
प्रगती पथी सर्वं काळ

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# सावित्रीबाई फुलेंचे कार्य समस्त मानव जातीला भूषणावह...

महाराष्ट्रातील पहिल्या स्त्री शिक्षिका सावित्रीबाई फुले यांचा आज म्हणजे १० मार्च २०२५ रोजी १२८ वा स्मृतिदिन. आज त्यांच्या स्मृतिदिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे. सावित्रीबाई फुले यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी साताऱ्याजवळील नायगाव या गावी झाला. त्यांच्या आईचे नाव लक्ष्मीबाई तर वडिलांचे नाव खंडूजी नेवसे असे होते. त्यांचे वडील गावचे पाटील होते. ज्या काळात स्त्रियांना घराच्या बाहेर पडायचे बंधन होते, त्याकाळात सावित्रीबाईंचा जन्म झाला. असे असले तरी सावित्रीबाई मात्र निडर स्वभावाच्या होत्या. त्या लहान असतांना एका दुबळ्या मुलाचे फुले पळवणाऱ्या धटिंगणाला त्यांनी अद्दल घडवली होती तसेच त्यांच्या घरासमोरील झाडावर असणाऱ्या घरट्यातील पक्षांची अंडी खाणाऱ्या नागाला त्यांनी ठेचून मारले होते. वयाच्या नवव्या वर्षी त्यांचा विवाह महात्मा जोतीराव फुले यांच्याशी झाला. जोतीराव तेंव्हा तेरा वर्षाचे होते. त्याकाळी बालविवाहाची परंपरा होती, अगदी पाळण्यात देखील विवाह लावले जायचे. महात्मा जोतीराव फुले म्हणजे महाराष्ट्रातील आद्य समाजसुधारक. जोतीरावांना मातृप्रेम लाभले नाही. त्यांच्या मावस भगिनी सगुणा यांनी त्यांचा सांभाळ केला. सगुणा इंग्रज अधिकाऱ्याकडे दाई म्हणून काम करायच्या त्यामुळे त्यांना इंग्रजी कळायचे. आपल्या जोतीरावने देखील इंग्रजी फाडफाड बोलले पाहिजे असे त्यांना वाटायचे. त्यांनी जोतीरावांना शिकण्यास प्रेरित केले. जोतीरावही शिकले नंतर जोतिरावांनी सावित्रीबाई यांनाही शिकवले. मुलींच्या शिक्षणाचे महत्व जाणून मुलींसाठी शाळा काढण्याचा निर्णय त्यांनी घेतला. ते नेहमी म्हणत एक मुलगी शिकली तर संपूर्ण कुटुंब शिकते म्हणून १ जानेवारी १८४८ रोजी पुण्यातील भिडे वाड्यात मुलींसाठी पहिली शाळा काढली. या शाळेत सावित्रीबाई फुले मुख्याध्यापक म्हणून काम पाहू लागल्या. या शाळेत सुरवातीला दोन मुली होत्या वर्षअखेर या शाळेतील मुलींची संख्या ४० ते ४५ पर्यंत पोहचली. या शाळेमुळे शूद्र समजल्या जाणाऱ्या स्त्री वर्गास ज्ञानाची कवाडे खुली झाली. पण हे चांगले काम त्याकाळातील सनातनी वर्गास रुचले नाही. मुली शाळेसाठी घराबाहेर पडू लागल्याने धर्म बुडाला अशी आरोळी ठोकत या सनातनी लोकांनी सावित्रीबाई व जोतीरावांच्या या महान कार्यास विरोध केला. सावित्रीबाई फुले यांच्या अंगावर शेण गोळे फेकले. काहींनी तर अंगावर हात टाकण्याचाही प्रयत्न केला पण फुले दांपत्य डगमगले नाही. घेतलेला वसा त्यांनी सोडला नाही. कितीही विरोध झाला तरी ध्येयापासून ते विचलित झाले नाही. जिद्दी व ध्येयवादी फुले दांपत्यांनी ज्ञानदानाचे आपले पवित्र कार्य चालूच ठेवले. जोतिरावांनी काढलेल्या शाळेत फुले दांपत्य व अन्य शिक्षक जीव ओतून शिकवत. विद्यार्थ्यांशी ते एकरूप होत त्यामुळे त्यांच्या शाळेची प्रगती लक्षणीय होती. त्यांच्या शाळेविषयी पुणे ऑब्जर्व्हर या दैनिकामध्ये २१ मे १८५२ मध्ये लिहिले होते, जोतीराव फुलेंच्या शाळेतील मुलींची संख्या सरकारी शाळेतील मुलांच्या संख्येपेक्षा दहा पटीने जास्त आहे कारण या शाळेत मुलींना शिकवण्याची जी व्यवस्था आहे ती मुलांच्या शासकीय शाळेपेक्षा चांगली आहे. १८६३ मध्ये फुले दांपत्यांनी बालहत्या प्रतिबंधकगृह सुरू केले. सावित्रीबाई त्याच्या प्रमुख होत्या. १८८५ पर्यंत ३५ विधवा ब्राह्मण स्त्रिया त्यांच्याकडे आल्या. त्यांची बाळंतपणे सावित्रीबाईंनी केली. १८७४ साली काशीबाई नावाच्या ब्राह्मण विधवा त्यांच्या घरात आल्या. या काशीबाईच्या मुलाला त्यांनी दत्तक घेतले त्या मुलाचे नाव यशवंत ठेवले. यशवंतला शिकवून त्यांनी डॉक्टर बनवले. सण १८७७ साली महाराष्ट्रात भीषण दुष्काळ पडला. या दुष्काळात फुले दांपत्यांनी लोकांना खूप मदत केली. त्यांनी दुष्काळग्रस्तांसाठी जेवणाखाण्याची सोय केली. सावित्रीबाईंनी केशवपन पद्धत बंद करण्यासाठी नाभिक समाजातील लोकांचे प्रबोधन करुन नाभिकांचा संप घडवून आणला. पुनर्विवाहाचा कायदा व्हावा यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. महात्मा फुलेंनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाची धुरा त्यांनी समर्थपणे वाहिली. सावित्रीबाई फुले या मोठ्या साहित्यिकही होत्या. काव्यफुले व बावनकशी सुबोध रत्नाकर हे काव्यसंग्रह त्यांनी लिहिले. १८९६-९७ साली पुण्यात प्लेगने धुमाकूळ घातला होता. प्लेग या जीवघेण्या आजाराने अनेकांचा जीव घेतला. हा रोग संसर्गजन्य आहे हे माहीत असूनही सावित्रीबाईंनी प्लेग पीडितांसाठी पुण्याजवळ दवाखाना सुरू केला. त्या रोग्यांची सेवा करु लागल्या. त्यांना आधार देऊ लागल्या. प्लेगच्या रोग्यांची सेवा करताना सावित्रीबाईंनाही प्लेगची लागण झाली त्यातून १० मार्च १८९७ रोजी त्यांचे निधन झाले. सावित्रीबाई फुले यांचे कार्य समस्त मानवजातीला भूषणावह आहे म्हणूनच स्मृतिदिनी त्यांना विनम्र अभिवादन!



**- श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## तवा येथे आघाडीतर्फे जागतिक महिला दिन साजरा




**अक्षराज : निलेश कासट**

**दि.०८, डहाणू (पालघर) :** युवा एल्गार आघाडी व ग्रुप ग्रामपंचायत तवा यांच्या संयुक्त विद्यमाने ८ मार्च जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात ग्रामपंचायत तवा हॉल येथे पार पडला.

महिला दिनाचे महत्त्व,कायदेविषयक मार्गदर्शन, विविध सरकारी योजनांचे अर्ज यांची माहिती आघाडीचे संस्थापक अध्यक्ष अँड.विराज गडग यांनी दिली.महिला सक्षमीकरण, महिलांचे आरोग्य तसेच महिलांना व्यापक संधी याबद्दल म ार्गदर्शन आदिवासी सेवक पुरस्कार सन्मानित सामाजिक कार्यकर्ते वसंत भसरा यांनी केले. यावेळी पत्रकार निलेश कासट तसेच लतिका बालशी माजी जिल्हा परिषद सदस्य यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी समाजातील रूढी प्रथा परंपरा जपणारे धवलेरी, सवासिन, तलनवाली, सुईंण, करवेली यांचा शाळ व गुलाबपुष्प देवून सत्कार केला. सोबतच ग्रामपंचायत सदस्य मनीषा नम, ताई झाटे, अंगणवाडी सेविका जागृती वनगा, कविता पावडे, सुरेखा उराडे, सीमा सोमण, आशा खडके, सविता पासरे, लतिका बालशी या प्रमुख महिलांचाही सत्कार यावेळी करण्यात आला. ओसरविरा येथील तल्हा कुटुंबातील आई बाबा दोघेही अपंग असताना चौघी मुलींना उच्चशिक्षित बनवल्याने गीता तल्हा, सीता तल्हा यांचा आईबाबांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून पालघर विधानसभेचे आमदार उपस्थित राहून महिलांना शुभेच्छा देत त्यांच्या अडीअडचणी समजून घेत ते सोडवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करेन असे आश्वासन यावेळी दिले. महिलांनी प्रत्येक क्षेत्रात पुढे आले पाहिजे असे मत माजी सरपंच तुळशी तल्हा - गडग यांनी व्यक्त केले.

यावेळी अँड.विराज गडग, सामाजिक कार्यकर्ते वसंत भसरा, सरपंच लहू बालशी, नंदकुमार लिलका, सुरेश पाडवी, रजनीताई गडग, पत्रकार निलेश कासट, ग्रामविकास अधिकारी सखाराम सातवी, सुरेखा उराडे, जागृती वनगा, रोहित किणी, साईनाथ धांगडा, अजय हबाली, अनिल नाठे तसेच सर्व अंगणवाडी सेविका उपस्थित होते.

## जलतारा म्हणजेच शेती करता नवसंजीवनी : तहसीलदार कुणाल झाल्टे



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०७, कारंजा (वाशीम) :** ग्रामपंचायत कार्यालय गायवळ परिसरामध्ये गाव समृद्धीकरिता जलतारा कार्यशाळा मा.तहसीलदार कुणाल झाल्टे यांच्या मार्गदर्शनात घेण्यात आली. यावेळी मा.तहसीलदार कुणाल झाल्टे यांनी जलतारा शेती करिता नवा संजीवनी व सुख समृद्धी घेऊन येईल असे प्रतिपादन केले. प्रत्येक शेतकऱ्यांनी एकरी एक जलधारा निर्माण करावा जलताऱ्याची निर्मिती करून गाव हे पाणीदार करावे या वेळी आवाहन केले. मार्गदर्शनामध्ये मा. तहसीलदार कुणाल झाल्टे यांनी जलतारा निर्मिती तंत्रज्ञान विषयी गावकऱ्यांना तंत्रशुद्ध माहिती दिली. तसेच राष्ट्रीय रोजगार हमी योजने अंतर्गत एकरी एक जलतारा उभारल्यास शासनाकडून अनुदान मिळणार असल्याबाबत सांगितले. तसेच ग्रामवासियांच्या प्रश्नाचे शंका निवारण केले. या वेळी गावातील सर्व लोकांनी एकरी एक जलधारा उभारण्याबाबत प्रतिज्ञा केली. गावामध्ये आता पर्यंत दहा जलतारा निर्मिती झालेली असून पुढील सात दिवसांमध्ये ५०० जलताराचे काम पूर्ण होईल असे आश्वासन कृषी सहाय्यक मंगेश सोळंके यांनी दिले. ग्राम गायवळ येथे या आधी तालुकास्तरीय जलतरा निर्मिती कार्यशाळा मा. तहसीलदार कुणाल झाल्टे यांच्या मार्गदर्शनात पार पडली आहे. त्याचे परिणाम तालुक्यातील बरेच शेतकऱ्यांनी जलताऱ्याची निर्मिती केलेली आहे. गाव पातळीवरील जलतरा कार्यशाळे करिता मा. कार्यकारी सरपंच सतीश पाटील राऊत सह सर्व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक राठोड, जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा येथील मुख्याध्यापक येवले सर व त्यांची सहकार्य टीम तसेच शेतीनिष्ठ झूघत आयडॉल शेतकरी रवींद्र गायकवाड उपस्थित होते. कार्यशाळा यशस्वीरित्या पार पाळण्याकरिता दिनेश गायकवाड अक्षय माने, रमेश मार्गे, अंकुश तुरक, अंकुश मुंदे अरुण इंगळे व धिरज ढवळे ग्रामपंचायत कर्मचारी बंडू इंगळे व त्यांचे सहकारी कर्मचारी यांनी अतोनात परिश्रम घेतले असे असल्याचे प्रतिनिधी कारंजा यांनी कळविले.

## के.रामलू शाळेतील चिमुकल्यांच्या कलेतून कुंडलवाडी शहर दणाणले

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.०९, बिलोली :** के. रामलू पब्लिक स्कूलमध्ये दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दिनांक ८ व ९ मार्च रोजी दोन दिवसीय सांस्कृतिक कला महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. यावेळी शाळेतील चिमुकल्यांनी वेगवेगळ्या गीतावर बहारदार असे नृत्य सादर करत प्रेक्षकांचे लक्ष वेधले. दिनांक ८ मार्च रोजी झालेल्या सांस्कृतिक कला महोत्सवाचे उद्घाटक तथा अध्यक्ष म्हणून माजी आमदार गंगाधरराव पटणे तर प्रमुख पाहुणे म्हणून लक्ष्मणरावजी ठक्करवाड भाजपा जिल्हा सरचिटणीस तथा सदस्य जिल्हा परिषद नांदेड गंगाधर पापुलवार संचालक आंतरभारती शिक्षण प्रसारक मंडळ साईनाथ उत्तरवार सामाजिक कार्यकर्ते शुती यादवराव तुडमे युवा अध्यक्ष अटल फाउंडेशन नवी दिल्ली आणि सदस्य बीजेपी युवा मोर्चा महाराष्ट्र राज्य संगीता मेरगेवार भाजपा महिला मोर्चा जिल्हा सरचिटणीस दक्षिण हे उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाच्या सुरुवातीस उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले राजमाता जिजाऊ कै. रामलू कोटलावार शाळेचे प्रेरणास्थान माजी आमदार कै. गंगारामजी ठक्करवाड यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमास सुरुवात झाली.

याप्रसंगी जेष्ठ पत्रकार ज्यांनी देह दानाचा संकल्प केला आहे असे सेवानिवृत्त प्राध्यापक शंकर पवार यांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. तसेच उपस्थित पत्रकारांचे सत्कार करण्यात आले. जागतिक महिला दिनानिमित्त विविध क्षेत्रातील महिलांचा कार्यक्रम ाप्रसंगी सत्कार करण्यात आला. यात श्रुती यादवराव तुडमे युवा अध्यक्ष अटल फाउंडेशन नवी दिल्ली आणि सदस्य बीजेपी युवा मोर्चा महाराष्ट्र राज्य व संगीता मेरगेवार भाजपा महिला मोर्चा जिल्हा सरचिटणीस दक्षिण यांचा शाळेच्या वतीने सन्मान करण्यात आला. शाळेतील चिमुकल्यांनी हिंदी तेलुगु मराठी गीतावर सादर केलेल्या नृत्यात आंबेडकर नाटक गोंधळ शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित नृत्य हे प्रमुख आकर्षण ठरले.या कार्यक्रमाचे प्रथम दिवसाचे सूत्रसंचलन शाळेचे मुख्याध्यापक पापय्याआप्पा मठवाले व संतोष भाले यांनी केले. तर आभार प्रदर्शन शाळेचे संस्था अध्यक्ष सायरेड्डी ठक्कूरवार यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सहभागी सर्व विद्यार्थी शाळेचे शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## प्रारूप विकास आराखड्यात बाधित होणाऱ्या कुटुंबांना बेघर होऊ देणार नाही - जिल्हाप्रमुख म्हात्रे



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०९, ठाणे :** ठाणे महानगरपालिकेने घोषित केलेल्या कळवा-खारेगाव विभागातील प्रारूप विकास आराखड्यामध्ये कळवा शास्त्रीनगर, सह्याद्री, सुदामा, दत्तवाडी आणि खारेगाव परिसरातील सुमारे ४०० पेक्षा अधिक कुटुंबे बाधित होणार आहेत.

या संभाव्य बाधित रहिवाशांच्या समस्या जाणून घेण्यासाठी आयोजित बैठकीत शिवसेना कल्याण जिल्हा प्रमुख दिपेश पुंडलिक म्हात्रे यांनी नागरिकांशी संवाद साधला. बैठकीत रहिवाशांनी त्यांच्या समस्या, अडचणी आणि चिंतेचे मुद्दे मांडले. त्यावर प्रतिक्रिया देताना दिपेश म्हात्रे यांनी आश्वासन दिले की, या विषयावर लवकरच ठाणे महानगरपालिका आयुक्त तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन रहिवाशांच्या हक्कांचा आवाज बुलंद करण्यात येईल. त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, जोपर्यंत रहिवाशांना न्याय मिळत नाही, तोपर्यंत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष ठामपणे त्यांच्या पाठीशी उभा राहील. रहिवाशांच्या हक्कांसाठी ही लढाई अखेरपर्यंत सुरूच राहील.

या बैठकीला शिवसेनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यामध्ये उपजिल्हा प्रमुख विजय देसाई, शहर प्रमुख लहू चाळके, दिवा शहर संघटक रोहिदास मुंडे, शहर संघटक रवींद्र सुर्वे, महिला शहर संघटिका कल्पना कवळे, उपशहर प्रमुख जितेंद्र गवते, विभाग प्रमुख दुर्योधन फडतरे, नंदू पाटील, संतोष कवळे, संतोष सुर्वे, विभाग महिला संघटिका अनिता गवते, अमिता चव्हाण, रुक्साना सावंत, युवा शहर समन्वयक साहिल पाटील, युवा विभाग अधिकारी आनिकेत कांबळे, दत्तात्रय राऊत, अमोल गोतारणे, उपविभाग प्रमुख रवींद्र साटम, गुरुदत्त देसाई, सुधीर चव्हाण, दौलत सरवणकर, नरेंद्र पवार, राजेंद्र दाते, युवा उपविभाग अधिकारी ऋग्वेद सावंत, शाखाप्रमुख प्रदीप जाधव, गणेश जाधव, संजय मापदि, समीर कदम, विवेक म्हात्रे, पांडुरंग लोगडे, सुदेश दरेकर, किशोर मिस्त्री, जगदीश चौधरी, राज रमेश पाटील, नरेंद्र विचारे, ज्ञानेश्वर पऱ्हाड, समस्त पदाधिकारी, शिवसैनिक, महिला आघाडी, युवासेना, युतीसेना तसेच कळवा डी.पी.प्लॅनम धील संभाव्य बाधित रहिवासी व गाळे धारक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मरावे परी अवयवरूपी उरावे; आयुष्याचे देणे फेडावे देहदानाने..!




**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.०९, बिलोली :** बिलोली तालुक्यातील आरळी येथील गुलाडे परिवाराने मरणोत्तर देहदानाचा संकल्प केला आहे. या कुटुंबाने मरणोत्तर देहदान हेच श्रेष्ठदान मानून कुटुंबातील आई, मुलगी व सूनबाई यांनी जागतिक महिला दिनाच्या पूर्वसंध्येला मरणोत्तर देहदान करण्याचा निर्णय घेतला. मरणोत्तर देहदानाचे अर्ज भरून नांदेड येथील शंकरराव चव्हाण शासकीय रुग्णालयात दाखल केला.

जीवन कितीही सुंदर असले तरी, मृत्यू हा अटळ आहे. त्यामुळे माणसाने जिवंतपणी परोपकाराची भावना जोपासून मनुष्य धर्माचे पालन केले असले तरी, मरणोपरांत अनेकांना जीवन देण्यासाठी देह खर्ची घालणे ही अनुभूती वेगळीच आहे.'देहादान हेच श्रेष्ठदान'असे जनजागृती करणारे वाक्य आपल्याला अनेक वेळा वाचनात येतात मात्र,हा संकल्प करतांना कुठली प्रक्रिया अवलंबली जाते, याची फारशी माहिती इच्छुकांना मिळत नाही. मरणोत्तर देहादानासाठी संबंधित संस्था किंवा मेडिकल कॉलेजच्या विनंती अर्जानंतर स्वेच्छापत्र तयार होते आणि ही प्रक्रिया सुरू होते. इच्छापत्र भरून दिल्यावर या विभागाद्वारे नोंदणी पत्र व क्रमांक संबंधित डॉक्टरचे टेलीफोन नंबर, आधीची माहितीही दिली जाते. अर्थातच सर्व वारस आणि नातेवाईकांच्या संमतीनेच हे स्वेच्छापत्र भरले जाते. म्हणून तर देहदान प्रक्रिया मृत्यु पश्चात सहा तासात होणे आवश्यक असते. तसेच फक्त नैसर्गिक मृत्यू झाल्यास देहदान करता येते. एड्स, डेंगू, कावीळ, टीबी नुकतेच ऑपरेशन झालेले मृत शरीर,अनेक वर्ष अंथरुणाला खिळून असलेल्या व्यक्तींचे शरीर यासाठी चालत नाही. अवयवदानाने एखाद्याला नवीन आयुष्य मिळू शकतं, थांबलेले जगणं सुरू होऊ शकतं. म्हणून भारतात ०६ऑगस्ट हा अवयव दान दिन म्हणून साजरा केला जातो.

मरनोत्तर आपल्या अवयवांचा उपयोग दुसऱ्या व्यक्तीला होऊ शकेल ते सर्व अवयव दान करून उपयोगात आणावेत. समजा एखाद्या व्यक्तीचा फॉर्म भरण्यापूर्वीच मृत्यू झाला व मृत व्यक्तींची अवयवदानाची इच्छा होती की नाही याविषयीही जवळच्या नातेवाईकांनाही काही माहिती नसेल तरीही मृताचे अवयवदान करणे योग्य असल्याचं डॉक्टरांनी सांगितलं तर त्या मृत व्यक्तीच्या जवळच्या एका नातेवाईकाच्या लेखी संमतीने ही अवयवदान करता येतं. अवयवदानाबाबत अनेक गैरसमज ही पसरलेले आहेत. त्यातला सर्वात मोठा गैरसमज म्हणजे या क्षेत्रातील काम करणाऱ्या संस्था अवयवांचा काळाबाजार किंवा मनमानी कारभार करत असणार म्हणून अनेकदा मृतांचे नातेवाईक आपल्या प्रियजनांचे अवयवदान करण्याचे टाळून त्या मृत व्यक्तीची इच्छा नजरेआड करताना दिसतात.परंतु येथे हे लक्षात घेणे आवश्यक आहे की, या क्षेत्रात काम करणाऱ्या संस्था अवयवादानासंबंधीच्या कायद्यातर्गत असलेल्या आंतरराष्ट्रीय मार्गदर्शक तत्त्वानुसारच काम करतात. एखाद्या व्यक्तीचा रुग्णालयात मृत्यू झालेला असल्यास वेळीच डॉक्टरांनी त्यांच्या नातेवाईकांना जाणीव करून दिल्यास अवयवदानाच्या संख्येत खारीचा तरी वाटा उचलणे शक्य होईल. कारण एका अवयवादानामुळे साधारण दहा गरजू व्यक्तींना संजीवनी मिळू शकते. पण मृतांच्या नातेवाईकांच्या वेळीचं ही गोष्ट त्या क्षणी उतरणे डॉक्टरांना कठीण जात असणार हे नाकारता येणार नाही. आणि ही संजीवनी प्रत्यक्षात गरजू पर्यंत पोहोचणारा मुख्य दुवा असतो तो म्हणजे त्या मृत व्यक्तींचा नातेवाईक. मृतदेहाची खूप विटंबना होते. काढलेल्या अवयवांचा काळाबाजार करतात. लोक काय म्हणतील,पुढचे सोयस्कर करायला पैसे खर्च करायला नकोत. इत्यादी कारणामुळे हे होत असणार. परंतु याहीपलीकडे जाऊन दानशूरतेची भूमिका पार पाडण्याचे काम गुलाडे परिवाराने केले आहे. बिलोली तालुक्यातील आरळी येथील मोहनराव गुलाडे यांनी मागील सहा वर्षापूर्वी मरणोत्तर देहदानाचा संकल्प करण्याचा पायंडा या कुटुंबात रुजवला. म्हणून तर आपल्या अवयवांचा उपयोग दुसऱ्या व्यक्तीला होऊ शकेल ते सर्व अवयवदान करून उपयोगात आणावेत अशी इच्छा बाळगून मृत्यू केव्हा व कसा येईल याची कल्पना नसल्याने किंवा वृद्धत्वामुळे आपले अवयव दुसऱ्याला कितीपत उपयोगी येतील याविषयी संशयक असल्याने निदान देहदान तरी करावा यापेक्षा वेगळं काही पुण्य कमवायची गरज नाही.

ते शरीर इतरांच्या उपयोगात येत असेल तर, ते दान करणे हे पुण्यच आहे. आपण ते केले पाहिजे अशा विचाराने त्यांनी कुटुंबीयांना प्रेरित केले. तसे संस्कार पण रुजवले. तीन महिलांनी आपल्या कुटुंबप्रमुखाच्या पावलावर पाऊल टाकत जागतिक महिला दिनाच्या पूर्वसंध्येला मोहनरावाच्या पत्नी कमल गुलाडे (४६), मुलगी रामेश्वरी गुलाडे (१९) व सूनबाई रंजिता गुलाडे (२५) यांनी प्रा.शंकर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली शंकरराव चव्हाण शासकीय रुग्णालयात मरणोत्तर देहदानाचे अर्ज शरीररचनाशास्त्र विभाग प्रमुख डॉ. अनिसूर रहमान, डॉ. पूर्वा कर्डिले यांच्याकडे सुपुर्द केले.

## घरकुल अपात्रांसाठी आता नव्याने सर्वेक्षण...

### ग्रामसेवकांवर जबाबदारी ; ३ महिन्यांत कार्यवाही




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.९, अहिल्यानगर :** प्रधानमंत्री आवास घरकुल योजनेच्या पहिल्या टप्प्यामध्ये केंद्र शासनाने मोठ्या प्रमाणावर घरकुलास मान्यता दिली आहे. २०१८ मध्ये आवास प्लस ऑनलाइन सर्वेक्षणमधील तयार करण्यात आलेल्या प्रतीक्षा यादीमध्ये समावेश नसलेल्या आणि यंत्रणेद्वारे अपात्र ठरलेल्या आणि सद्यस्थितीत पात्र असलेले कुटुंबाचे प्रधानमंत्री आवास योजना टप्पा क्रमांक दोन अंतर्गत सुधारीत सर्वेक्षण केले जाणार आहे. या सर्वेक्षणाची जबाबदारी संबंधीत गावातील ग्रामसेवकांवर सोपवण्यात आली असून पुढील तीन महिन्यांत नवीन पात्र लाभार्थ्यांची यादी तयार करण्यात येणार आहे. प्रधानमंत्री आवास घरकुल योजनेसाठी शासनाने २०१२ मध्ये गावनिहाय आवास प्लस हे ऑनलाइन सर्वेक्षण केले होते. या सर्वेक्षणाच्या आधारे शासनाने २०१८ मध्ये घरकुलासाठी गावनिहाय लाभार्थ्यांची प्रतिक्षा यादी तयार करण्यात आली होती. या प्रतीक्षा यादीतून लाभार्थ्यांना केंद्र शासनाकडून घरकुलाचा लाभ टप्प्याटप्प्याने देण्यात येत होता. पहिला टप्प्यामध्ये प्रतिक्षा यादीतील लाभार्थी मार्च २०२५ पर्यंत उद्दिष्ट पूर्ण केले जाणार आहे.

त्याप्रमाणे लाभार्थ्यांचे रजिस्ट्रेशन करण्यात येऊन १५ हजार रुपये पहिला हप्ता खात्यामध्ये वर्ग करण्यात आला आहे. २०१८ मध्ये झालेल्या आवास प्लस सर्वेक्षणच्या प्रतिक्षा यादीमध्ये अनेक पात्र कुटुंबाचा समावेश नसल्याने या कुटुंबांना घरकुलाचा लाभ द्यावा अशी मागणी मागील काही वर्षापासून लाभार्थी कुटुंबाकडून सातत्याने केली जात होती. आता शासनाने प्रधानमंत्री आवास घरकुल योजना टप्पा क्रमांक दोन अंतर्गत पात्र कुटुंबाची सर्वेक्षण मोहीम हाती घेतली आहे. तसेच तयारी होणाऱ्या नवीन सर्व्हेक्षण यादीची रॅन्डम (अकस्मात) तपासणीचे काम मुख्य कार्यकारी अधिकारी व गटविकास अधिकारी यांना करावी लागणार आहे.

## उमराठच्या महिलांनी कापडी पिशवी वापरण्याचा केला निर्धार

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.०८, गुहागर (रत्नागिरी) :** गुहागर तालुक्यातील जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक शाळा उमराठ न.१ येथील सभागृहात शनिवार, दि.०८ मार्च २०२५ रोजी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत ग्रामपंचायत उमराठ तर्फे गावातील कर्तृत्ववान महिलांचा, बचत गटातील म हिलांचा आणि विशेष प्रावीण्य मिळविणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला. सदर प्रसंगी माता जिजाऊ,सावित्रीबाई फुले, अहिल्यादेवी होळकर, माता रमाई यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दिप प्रज्वलन करून सरपंच जनार्दन आंबेकर, आरोग्य सहाय्यीका लक्ष्मीबाई बिर्जे तसेच उपस्थित सर्व महिलांनी प्रतिमेना पुष्पसुमने अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर प्रस्तावना करतांना सरपंच जनार्दन आंबेकर यांनी उपस्थित सर्व महिलांचे स्वागत करून जागतिक महिला दिनानिमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या. प्रसंगी उमराठ आरोग्यवर्धिनी केंद्राच्या आरोग्य सेविका रूचिता कदम यांनी आरोग्याची काळजी कशी घ्यावी तसेच शासनाच्या आरोग्य विभागाच्या माध्यमातून दिले जात असलेली आभा कार्ड आणि आयुष्यमान कार्ड यांचे फायदे काय आहेत ते सांगून सर्वांनी ही काड्र्स आवश्य काढून घ्यावे असे आवाहन केले. तर प्रमुख मार्गदर्शक लक्ष्मीबाई बिर्जे यांनी सुद्धा आरोग्य विषयक काळजी, नैसर्गिक येणाऱ्या मासिक पाळी बाबत समज/गैरसमज, घ्यायची काळजी, सद्या असुरक्षित परिस्थितीत महिला व किशोरवयीन मुलींना प्रसंगानुरूप न घाबरता आपले स्वसंरक्षण कसे करावे, आपल्या कुटुंबात नेहमी सुसंवाद का असावा, आपल्या मुला-मुलींना चांगल्या /वाईट गोष्टींची जाणीव करून देणे गरजेचे का असते, मोबाईल आणि टि. व्ही.चे दुष्परिणाम इत्यादी बाबतीत मार्गदर्शन केले. तद्नंतर उपस्थित सर्व महिलांचा हळदीकुंकू, पुष्पगुच्छ व वाण देऊन यथोचित सन्मानीत करण्यात आले. शेवटी सरपंच जनार्दन आंबेकर यांच्यासह सर्व महिलांनी स्वच्छते विषयी शपथ घेतली की, आम्ही उमराठ गावाच्या नागरिक आहोत. आम्ही आज जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून शपथ घेतो की, मी माझे घर, परिसर, वाडी परिसर व गाव परिसर स्वच्छ ठेवीन. घरातील केर-कचरा मी ग्रामपंचायती मधून दिलेल्या कचरा कुंडीतच जमा करेन, इतरत्र कुठेही टाकणार नाही. तसेच मी व माझे कुटुंब नेहमी कापडी पिशवीचाच वापर करेन व इतरांना सुद्धा तसे करण्यास सांगेन असा निर्धार उमराठच्या महिलांनी करून कार्यक्रमाची सांगता झाली. सदर कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती, मार्गदर्शक म्हणून हेदवी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आरोग्य सहाय्यीका लक्ष्मीबाई कमलाकर बिर्जे तसेच उमराठ गावचे सरपंच जनार्दन आंबेकर, जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते अशोकराव जालगावकर यांच्या सहीत मोठ्या प्रमाणात गावातील महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

